# ब्रेस्ट कॅन्सरची जागृती

**माहीम :** सातत्याने पाहणी व संशोधनातून समोर आल्यानुसार ब्रेस्ट कॅन्सरच्या प्रमाणात झालेल्या वाढीविषयी लोक जागृती करण्यासाठी नानावटी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्यावतीने (एनएसएसएच) ब्रेस्ट कॅन्सर संबंधित विविध मोफत जागृती कार्यक्रम २० फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. या एकदिवसीय कार्यक्रमाचे आयोजन सर्व लोकांसाठी २० फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता एनएसएसएच ऑडिटोरिअममध्ये केले आहे. त्यामध्ये एनएसएसएचमधील सर्जिकल ओन्कोलॉजीचे प्रमुख डॉ. संजय दुधात यांचे ब्रेस्ट कॅन्सर जागृतीवरील व्याख्यान समाविष्ट असेल.

व्याख्यानाच्या दरम्यान, डॉ. दुधात ब्रेस्ट कॅन्सर होण्यास कारणीभूत असलेल्या विविध कारणांचा सविस्तर आढावा घेतील आणि योग्य पाहणी व वैद्यकीय सल्ला यामार्फत ब्रेस्ट कॅन्सरचे प्रकार कमी करता येऊ शकतात यावर भर देतील. व्याख्यानानंतर डॉ. दुधात यांचे समुपदेशन सत्र होणार आहे. ब्रेस्ट सेल्फ-एक्झामिनेशन (बीएसई) यासारख्या आधुनिक डिटेक्शन तंत्रामुळे सुरुवातीच्या टप्प्यात रोगाचे निदान करणे शक्य होते. एनएसएसएचमधील रेडिऑलॉजिस्ट डॉ. रश्मी पारिख या तंत्राविषयी तपशीलवार माहिती देणार आहेत. या तंत्रामुळे व्यक्तीला कोणतेही शारीरिक वा दृष्य बदल असल्यास ते तपासण्यासाठी ब्रेस्ट टिश्यूंची पाहणी करता येते. डॉ. पारिख यांच्या या सत्रामध्ये सध्या उपलब्ध असलेल्या ब्रेस्ट कॅन्सर उपचार तंत्रांविषयीही माहिती दिली जाईल.